**( डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी वसतीगृह प्रवेशाकरीता करावयाचा अर्ज व नियमावली )**

दिनांक :— —08—2018

प्रति,

मा.प्राचार्य तथा सचिव,

डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना,

पु.ला.शासकीय तंत्रनिकेतन, लातूर.

| फोटो |
|---|

विषय :— डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहामध्ये प्रवेश मिळणेबाबत.

अर्जदार :—

महोदय,

वरील विषयानुसार मी विनंती अर्ज करीत आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णयक.संकिर्ण—2018 /प्र.क.249/ तांशि—4 दि.10 ऑगस्ट 2018 मध्ये नमूद केलेल्या अटी मी पूर्ण करीत असुन कृपया मला लातूर येथे सुरु होत असलेल्या वसतिगृहामध्ये प्रवेश मिळावा ही नम्र विनंती.

माझी माहिती खालीलप्रमाणे असून त्याबाबत कागदपत्रांची छायाप्रत सोबत जोडत आहे.

01. मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची प्रत / चालु वर्षातील सामायिक प्रवेश परीक्षेच्या गुणपत्रिकेची प्रत

02. महाराष्ट्र राज्याचा निवासी असल्याचा दाखला (Domicile Certificate)

03. महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्याचा पुरावा

04. पालक नोकरी करीत असल्यास आयकर नमूना 16—अ चा फॉर्म (विद्यार्थी व पालकाचे मिळून एकूण वार्षिक उत्पन्न रु.8.00 लक्ष मर्यादेपर्यंत असावे)

05. आयकर पात्र पालकांच्या आयकर विवरणपत्राची (Income Tax Return) प्रत.

06. आयकर पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी तहसिलदार / सक्षम अधिका—यांनी स्वाक्षरी केलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याची प्रत

07. शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांकडुन प्रकृती चांगली असल्याबाबत तसेच, संसर्गजन्य रोग नसल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र

# विद्यार्थ्यांचेकरीता पात्रता

01. सदर विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.

02. विद्यार्थ्यांचे व पालकाचे मिळुन एकुण वार्षिक उत्पन्न रु.8.00 लक्ष मर्यादेपर्यंत असावे.

03. शासनाने वेळोवेळी घोषित केल्याप्रमाणे व्यावसायिक अभ्यासकमांसाठी केंद्रीभुत प्रवेश प्रकीयेद्वारे प्रवेश घेतलेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र असतील.

04. बिगर व्यावसायिक उच्च शिक्षण अभ्यासकमासाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र असतील.

05. इयत्ता 11 वी व 12 वर्गामध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र असतील.

06. वसतीगृहात प्रवेश घेण्यासाठी किमान वयोमर्यादा 16 व कमाल वयोमर्यादा 25 राहील.

07. अशा विद्यार्थ्यांची मागील शैक्षणिक वर्षात वर्गात 75 % उपस्थिती असल्याचे संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य अथवा संचालक यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

08. आधीच्या शैक्षणिक वर्षात दिलेली परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असुन अनुत्तीर्ण असणा—या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येणार नाही.

09. त्यानंतरच्या शैक्षणिक वर्षादरम्यान सदर विद्यार्थ्यांना उत्तीर्ण झाल्यावर वसतिगृहात जागा रिक्त असल्यासच प्रवेश देण्यांत येईल.

10. वसतिगृहातील वास्तव्य कालावधीत त्यांच्याविरुध्द संबंधित वसतीगृहाचे वार्डन वा महाविद्यालयाकडून कोणतीही शिस्तभंगविषये कारवाई झालेली नसावी किंवा त्यांच्या गैरवर्तणुकीबाबत संबंधित वसतिगृहाचे वॉर्डन वा संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आक्षेप घेतलेला नसावा.

11. नोकरी करीत असलेला विद्यार्थी हा वसतिगृह प्रवेशास अपात्र ठरेल.

12. सत्र कालावधी पहिले सत्र 10 जून ते 30 नोव्हेंबर व दुसरे सत्र 1 डिसेंबर ते 30 एप्रिल तथापि, अभ्यासकमानुसार यामध्ये बदल करता येईल.

13. विद्यार्थ्याने ज्या संस्थेमध्ये प्रवेश घेतला आहे ती संस्था ज्या शहरात / गावात असेल आणि असा विद्यार्थि त्या शहरात / गावात वास्तव्यात असेल तर त्या विद्यार्थ्यास वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी अपात्र समजण्यात येईल.

14. प्रवेशासाठी अर्ज करताना अर्जात खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे आढळून आल्यास सदर विद्यार्थ्याचा प्रवेश तात्काळ रद्य केला जाईल.

15. अधीकची माहिती व नियम शासन निर्णयक.संकिर्ण—2018 /प्र.क.249/ तांशि—4 दि.10 ऑगस्ट 2018 मध्ये नमूद केलेल्या आहेत.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी :

संपर्ण नांव :

संपूर्ण पत्ता , मोबाईल कमांक :

टिप : विद्यार्थ्यांनी वरील अर्ज पूर्णपणे भरुन कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडाव्यात.

## पालकाचे हमीपत्र

वरील सर्व नियम मी वाचले असून माझा पाल्य वरील सर्व नियमांचे पालन करील अशी हमी देत आहे. जर माझ्या पाल्याकडुन काही गैरवर्तणुक झालेस नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याबाबत मला जाणीव आहे व त्यास माझी संमती आहे.

पालकाची दिनांकीत स्वाक्षरी